# डॉ. बाबासाहेब आंबेडकर
## (दि.१४ एप्रिल, १८९१ – ६ डिसेंबर, १९५६)
## (अल्प परिचय)

एक थोर भारतीय पुढारी, अस्पृश्यांचे नेते व भारतीय संविधानाचे शिल्पकार. रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगडाजवळ असलेले आंबडवे हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे वडील रामजी सकपाळ हे लष्करात सुभेदार मेजर होते. ते महू येथे असताना आंबेडकरांचा जन्म झाला. आंबेडकर सहा वर्षांचे असतानाच त्यांची आई भीमाबाई मरण पावली. आंबेडकरांचे पुढील सर्व पालनपोषण रामजी व त्यांची बहीण मीराबाई यांनी केले. रामजी लष्करातून निवृत्त झाल्यावर कुटुंबासह नोकरीसाठी साताऱ्यास आले. त्यामुळे आंबेडकरांचे प्राथमिक शिक्षण साताऱ्यात झाले.

आंबेडकरांचे माध्यमिक व विश्वविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूल व कॉलेजमध्ये झाले. सन १९१३ मध्ये ते उच्च शिक्षणासाठी अमेरिकेस गेले. तेथील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी अर्थशास्त्र विषयात एम.ए. व पीएच. डी. या पदव्या मिळविल्या. मुंबई येथे दिनांक ३१ जानेवारी, १९२० रोजी *“मूकनायक”* नावाचे पाक्षिक काढले.

नवल भंथेना आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या मदतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंग्लंडला गेले. त्यांनी लंडन विद्यापीठाची डी.एससी. ही दुर्लभ पदवी सन १९२३ साली संपादन केली. ते बॅरिस्टरही झाले. मायदेशी परतताच मुंबईस त्यांनी वकिली सुरू केली. सरकारी विधि महाविद्यालयात त्यांनी काही काळ प्राध्यापकाचे व प्राचार्याचेही काम केले. सन १९२४ मध्ये त्यांनी “बहिष्कृत हितकारिणी” ही संस्था स्थापन केली. “शिकवा, चेतवा व संघटित करा” हे या संस्थेचे ब्रीदवाक्य होते. सन १९२७ मध्ये कुलाबा जिल्ह्यातील (सध्याचा रायगड जिल्हा) महाडच्या चवदार तळ्यावर अस्पृश्यांना इतरांप्रमाणे पाणी भरता यावे, म्हणून त्यांनी आपल्या हजारो अनुयायांसह सत्याग्रह केला. अस्पृश्यांना इतरांप्रमाणे देवाचे दर्शन घेता यावे, म्हणून त्यांनी आपल्या अनुयायांसह सन १९३० साली नाशिक येथे काळराममंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला. त्यांनी *“बहिष्कृत भारत”*, *“जनता”*, *“समता”*, इ.वर्तमानपत्रांद्वारे त्याचप्रमाणे बहिष्कृत हितकारिणी व इतर संस्थाद्वारे अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाविरूध्द आवाज उठविला.

सन १९४२ साली त्यांनी “ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशन” नावाचा देशव्यापी पक्ष स्थापन केला. या पक्षातर्फे अस्पृश्यांकरिता त्यांनी अनेक लढे दिले. सन १९४२ पासून सन १९४६ पर्यंत ते व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात मजूरमंत्री होते. या काळात त्यांनी अस्पृश्यांची शैक्षणिक व आर्थिक उन्नती करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी “पीपल्स एज्युकेशन सोसायटी” स्थापन केली व मुंबईस सिध्दार्थ महाविद्यालय

सुरू केले. याच संस्थेने पुढे औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन केले. भारत स्वतंत्र झाल्यावर ते केंद्रीय मंत्रिमंडळात विधिमंत्री म्हणून आले.

आंबेडकरांवर मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून भारतीय संविधानाच्या निर्मितीची जबाबदारी सोपवली गेली होती. याशिवाय संविधान सभेच्या मूलभूत अधिकार समिती, अल्पसंख्यांक उपसमिती, सल्लागार समिती, ध्वज समिती, संघराज्य अधिकार समिती, संघराज्य घटना समिती व प्रांतिक घटना समिती अशा अनेक समित्यांवर सदस्य म्हणूनही आंबेडकरांनी काम केले. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत मोठा सहभाग असल्यामुळे आंबेडकरांना "भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार किंवा भारतीय संविधानाचे निर्माते म्हटले जाते". दिनांक १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी नागपूर येथे मोठ्या समारंभाने अनेक अनुयायांसह त्यांनी बौध्द धर्म स्वीकारला.

धर्म आणि जातिसंस्था या संबंधी डॉ. आंबेडकरांचे विचार क्रांतिकारक होते. आंबेडकरांच्या व्यासंगाचे व संशोधन कुशलतेचे प्रतीक असलेला ग्रंथ म्हणजे "*हू वेअर द शूद्राज?*"(१९४६) हा होय. "*द अन्‌टचेबल्स*"(१९४८) या नावाचे त्यांचे पुस्तकही या संदर्भात उल्लेखनीय आहे. "*बुध्द अँड हिज धम्म*" हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ त्यांच्या मरणोत्तर प्रसिध्द झाला (१९५७). सन १९९० मध्ये, त्यांना मरणोत्तर "भारतरत्न" हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला.

*****

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)